**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १३४/२०१९**
**निशाणी १३९ पुढे सुरु**

शपथेवर पुढे सुरु –

**<u>पुढील सरतपास गैरअर्जदार क्र. ५ तर्फे वकिल श्री. एस.ए. कुऱ्हाडे यांचे मार्फत</u>**

९. मी माझे सरतपासाताचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

सरतपास पुर्ण.

**<u>उलटतपास अर्जदार तर्फे वकील श्री.एस.टी.इंगळे यांचे मार्फत</u>**

१०. मी माझ्या पुरावा शपथपत्रात दिलेला पत्ता बरोबर आहे. त्या पत्यावर असलेले घर माझ्या स्वतःच्या मालकीचे आहे. मी त्या घरात मागील २० वर्षापासुन माझे कुटुंबासह राहतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे सासु सासरे यांचे घर माझ्या घरापासुन जवळ आहे. मी व माझी पत्नी - नजमुसहेर यांनी दाखल केलेला एकत्रित जबाब आमच्या सांगण्याप्रमाणे तयार करण्यात आलेला आहे.

११. माझे पुरावा शपथपत्रातील परिच्छेद क्र. २ मधील मजकूर ''माझे सासरे नामे मोहम्मद अब्दुल खालीक .............. मला २००५ मध्ये सांगितली'' असा मजकुर मी माझ्या लेखी जबाब तयार करतांना वकीलांना सांगितला होता. परंतु सदर मजकुर माझ्या लेखी जबाबात नमुद नाही. सदर मजकुर माझ्या लेखी जबाबत नमुद नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही. माझे पुरावा शपथपत्रातील परिच्छेद क्र. ३ मधील मजकूर ''माझे लग्न सन १९९२ मध्ये ..................आमचा काही संपर्क नव्हता'' असा मजकुर मी माझ्या लेखी जबाब तयार करतांना वकीलांना सांगितला होता. परंतु सदर मजकुर माझ्या लेखी जबाबात नमुद नाही. सदर मजकुर माझ्या लेखी जबाबत नमुद नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही. माझे पुरावा शपथपत्रातील परिच्छेद क्र. ४ मधील संपुर्ण मजकूर ''अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांच्या लग्नाच्या ...............माझे सासु सासरे व मी लग्नास होकार दिला'' असा मजकुर मी माझ्या लेखी जबाब तयार करतांना वकीलांना सांगितला नव्हता. परिच्छेद क्र. ४ मधील मजकूर मी आजरोजी न्यायालयात पहिल्यांदा माझे पुराव्याच्या शपथपत्रात सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही

की, मी उपरोक्त नमुद केलेला संपुर्ण मजकुर खोटा सांगितलेला आहे.

१२. माझे पुरावा शपथपत्रातील पान नं. ४ वरील परिच्छेद क्र. ४ मधील मजकूर "अर्जदार हिचे वडील व भाउ............माझा संशय खरा असल्याची अनुभुती झाली" असा मजकुर मी माझ्या लेखी जबाब तयार करतांना वकीलांना सांगितला होता. परंतु सदर मजकुर माझ्या लेखी जबाबात नमुद नाही. सदर मजकुर माझ्या लेखी जबाबत नमुद नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही. माझे पुरावा शपथपत्रातील पान नं. ४ वरील परिच्छेद क्र. ५ मधील मजकूर "लग्न झाल्यापासुन ३ वर्षापर्यंत...........संपुर्ण षडयंत्र मोठया शिताफिने रचलेले आहे" असा मजकुर मी माझ्या लेखी जबाब तयार करतांना वकीलांना सांगितला नव्हता. परिच्छेद क्र. ५ मधील मजकूर मी आजरोजी न्यायालयात पहिल्यांदा माझे पुराव्याच्या शपथपत्रात सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी उपरोक्त नमुद केलेला संपुर्ण मजकुर खोटा सांगितलेला आहे. माझे पुरावा शपथपत्रातील पान नं. ५ वरील परिच्छेद क्र. ६ मधील मजकूर "मला व माझ्या पतीला बेकायदेशीर..........अर्जदार ही जबाबदार आहे" असा मजकुर मी माझ्या लेखी जबाब तयार करतांना वकीलांना सांगितला नव्हता. परिच्छेद क्र. ६ मधील मजकूर मी आजरोजी न्यायालयात पहिल्यांदा माझे पुराव्याच्या शपथपत्रात सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी उपरोक्त नमुद केलेला संपुर्ण मजकुर खोटा सांगितलेला आहे.

१३. माझे पुरावा शपथपत्रातील पान नं. ५ वरील परिच्छेद क्र.७ मधील मजकूर "अनेक वेळा मी सदरचा वाद ..............अर्जदार हिला भडकावुन देत आहे" असा मजकुर मी माझ्या लेखी जबाब तयार करतांना वकीलांना सांगितला होता. परंतु सदर मजकुर माझ्या लेखी जबाबात नमुद नाही. सदर मजकुर माझ्या लेखी जबाबत नमुद नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही. माझे पुरावा शपथपत्रातील पान नं. ६ वरील परिच्छेद क्र. ८ मधील मजकूर "मी प्राध्यापक म्हणून सेवा दिलेली............संपुर्ण परिवार जीवन जगत आहे" असा मजकुर मी माझ्या लेखी जबाब तयार करतांना वकीलांना सांगितला होता किंवा कसे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पुरावा शपथपत्रातील सदर मजकुर मी खोटा सांगितला आहे.

१४. गैरअर्जदार क्र. ६ सहबाशाहीन ही व्यवसायाने डॉक्टर आहे. ते पुणे येथे वास्तव्यास आहे. सहबाशाहीनचे पती भारतीय सैन्यात चांगल्या पदावर कार्यरत आहे. आजरोजी ते कश्मीर मध्ये कर्नल या पदावर कार्यरत आहेत. सहबाशाहिन व त्यांची मुले वैद्यकीय व्यवसाय आणि मुलांच्या शिक्षणासाठी पुणे येथे राहतात. सहबाशाहिन

न्यायालयात आल्या होत्या. सहबाशाहिन हिने त्यांचा जबाब व पुरावा दाखल केला किंवा नाही हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सर्व गैरअर्जदार यांनी अर्जदार हिचा कौटुंबिक हिंसाचार करुन छळ केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यापासुन बचाव व्हावा म्हणुन मी खोटा जबाब व पुरावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे पुरावा शपथपत्रातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

दिनांक : २६/११/२०२४.
ठिकाणः बाळापूर

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
समक्ष

PATIL DIPMALA MAHENDRA

Digitally signed by PATIL DIPMALA MAHENDRA
Date: 2024.11.27 11:30:48 +0530

( श्रीमती डी. एम. पाटील )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
बाळापूर.